# शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर

# *Government Medical College, Nagpur*

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF MAHARASHTRA

# नागरिकांची सनद

## नागरिकांचे आरोग्य हक्क सनद :

हा दवाखाना आपला आहे. येथे आपल्याला खालील प्रकारच्या आरोग्य सेवा देण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

- रूग्णसेवा, चिकित्सा, शुश्रुषा व निदान हेच या संस्थेचे व्रत असून त्यासाठी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर सदैव कार्यतत्पर राहिल.
- कुठल्याही रूग्णाला आरोग्य सेवा नाकारल्या जाणार नाही. खाजगी डॉक्टरांकडे किवा दवाखान्यात पाठविल्या जाणार नाही. खाजगी दवाखान्यात शुल्क भरून आरोग्य सेवा घेण्यासाठी पाठविल्या जाणार नाही.
- उपचारासाठी औषधे या दवाखान्यातून मोफ़त दिल्या जातील किवा शासकिय नियमानुसार जे शुल्क ठरवून देण्यात आले आहे त्यापेक्षा जास्त शुल्क आकारण्यात येणार नाही. मुदत संपलेली औषधे दिली जाणार नाहीत. बाहेरून औषधी खरेदी करण्यासाठी सांगितले जाणार नाही.

- ❖ रूग्णसेवा देतांना आवश्यक ती सर्व माहिती रूग्णास व त्यांच्या नातेवाईकास दिल्या जाईल तसेच त्यांच्या सर्व शंकांचे निरसण करण्यात येईल.
- ❖ रूग्णसेवा देतांना तसेच कोणतेही दाखले किवा प्रमाणपत्रे देतांना सर्व शासकिय नियमांचे काटेकोरपणे पालन केल्या जाईल.
- ❖ सर्व रूग्णांना विशेषत: गरिब निरक्षर रूग्णांना आदराची वागणूक दिली जाईल. उपचाराबद्दल सविस्तर माहिती दिली जाईल. या दवाखान्यात उपलब्ध नसलेल्या सेवा अन्यत्र कोणत्या शासकिय दवाखान्यात मिळतील याची माहिती दिली जाईल. गरज भासल्यास पुढील संदर्भ सेवेसाठी पुढे पाठविण्याची व्यवस्था केल्या जाईल.
- ❖ एच. आय. व्ही. बाधीत रूग्णांना औषधे सेवा नाकारली जाणार नाही व त्यांनी डॉक्टरांना दिलेली माहिती गोपनिय ठेवली जाईल.
- ❖ तसेच रूग्णसेवा देतांना सर्वांना समान वागणूक दिली जाईल. रूग्णांसोबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव केल्या जाणार नाही.
- ❖ सर्व रूग्णांसाठी स्वच्छता गृह व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येईल.

आपल्या काही सूचना किवा तक्रारी असल्यास सुचना पेटीत लिहून टाकाव्यात.

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर ( केंद्राचे नाव ) येथे लोकाधिकारी व देखरेख समिती कार्यरत आहे, आपल्या सुचना किवा तक्रारी देखरेख समितीकडे पाठविण्यासाठी.

१) नाव : वैद्यकिय अधिक्षक, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर
दुरध्वनी : ०७१२ २७५०४२७ फ़ॅक्स : ०७१२ २७४९३११
Email : msgmchnag2013@gmail.com

२) नाव : अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर.
दुरध्वनी : ०७१२ २७४१६४२ फ़ॅक्स : ०७१२ २७४४४८९
Email : deangmc2@gmail.com

यांना संपर्क करावा.